# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :-** विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत **एम.फार्म/एम.ई/.एम.टेक./एम.आर्च /एम.टेक्स्ट.** या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे सिनॉपसिस छाननीसाठी या विभागात सादर करण्याबाबत......

सर्व प्राचार्य/संचालक, पदव्युत्तर अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रज्ञान अधिविभाग यांना कळविण्यात येते की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत **एम.फार्म/एम.ई/.एम.टेक./एम.आर्च/एम.टेक्स्ट.** या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे सिनॉपसिस मान्यतेसाठी वर्षातून दि. **१ जानेवारी ते** दि. **३१ जानेवारी व** दि. **१ ऑगस्ट ते** दि. **३१ ऑगस्ट** असे दोन वेळा पीजीबीयुटीआर विभागामध्ये स्विकारले जातील. सदरचे सिनॉपसिस मान्यतेसाठी अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा) यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त छाननी समिती समोर सादर करण्यात येतात.

१) तेव्हा **एम.फार्म/एम.ई/.एम.टेक./एम.आर्च/एम.टेक्स्ट.** या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे सिनॉपसिस प्राचार्य/संचालक यांचेमार्फत संबंधित अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रज्ञान अधिविभाग यांनी **दि. ३१ जानेवारी, २०२४ पर्यंत सिनॉपसिस या विभागात जमा करण्यात यावेत.**

२) **दि. ३१ जानेवारी, २०२४** नंतर जमा होणा-या सिनॉपसिसच्या छाननीसाठी विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे सिनॉपसिस सादर करण्याचा पुढील कालावधी **दि. १ ऑगस्ट ते दि. ३१ ऑगस्ट** असा असेल. तेंव्हा सदरचे सिनॉपसिस वर नमूद केल्याप्रमाणे निर्धारीत वेळेत या विभागास जमा करण्यात यावेत.

आदेशावरून,

प्र.कुलसचिव

पीजीबीयुटीआर विभाग 3414
दि. 31 JUL 2023
प्रत :

१. संचालक/समन्वयक/प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२. इंटरनेट सेल (सर्व संशोधनार्थींच्या माहितीकरीता सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्याकरीता)